# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२०/M/००१५५१**

**अपिलार्थी श्री. इहतेश्याम कुतुबुद्दीन सिद्दीकी**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| तत्कालीन जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०८.२०१९ | ०९.०९.२०१९ | २८.०९.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २४.०१.२०१९ रोजीच्या अर्जांन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०९.०९.२०१९ संलग्न केले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या दि. २२.०८.२०१९ च्या अर्जान्वये ऑक्टोपस पोलीस स्टेशन, हैद्राबाद यांचेकडून पोलीस महासंचालक कार्यालयात मार्च-२०१९ व एप्रिल २०१९ दरम्यान प्राप्त अहवालाविषयी माहिती विचारली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.०९.०९.२०१९ अन्वये सदर विषय दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य यांचेशी संबंधित असल्याने अपिलार्थींचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) अन्वये पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करुन अर्जदास कळविले.

अर्जदाराचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत.

..२/-

माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद करुन अपिलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित होते. विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी दि. १७.११.२०२१ रोजी आयोगास सादर केलेल्या अहवाल आयोगाच्या निदर्शनांस आणून नमूद केले की, वर्ष २००५ पासून DJMS संगणकीकृत प्रणाली कार्यान्वीत होती व दि. ०१.०५.२००९ पासून नाईन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली. परंतू सदर संगणक प्रणालीमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाल्याने दि. २८.०२.२०१८ पासून सदरच्या संगणक प्रणालीद्वारे संगणकीकृत टपाल नोंदीची सुविधा बंद झाली आहे. त्यामुळे सदर कालावधीतील माहिती उपलब्ध (Retrieve) होऊ शकत नाही.

अपिलार्थी यांनी आयोगास नमूद केले की, त्यांना सदर विषयी काही कळविण्यात आलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेला अहवाल दिनांक १७.११.२०२१ ची प्रत सहपत्रांसहीत अपिलार्थी यांना सदर आदेश प्राप्तीचे १५ दिवसात नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनाप्रमाणे कार्यवाही करावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**